**आशा**

सागराच्या शीतल सुखद लाटांवरती
पश्चिमेचा रवी अलगद विराजितो
आणि स्मृतीकिरणांच्या संधीप्रकाशात
मीच मजला हरवून बसतो
आयुष्याची झाली तिन्हीसांज
पौर्णिमेचा चंद्र अजून देतोय दिलासा
चांदण्याची रात्र नाही संपलेली
उद्याचा उषःकाल फुलवेल नवीन आशा
घरट्यातील पाखरे कधीच गेली उडून
एकांताच्या सागरात गेलो मी डुंबून
दूरवरून रिझवतोय वाऱ्याचा मंजूळ नाद
निसर्गाच्या सान्निध्यात मनाला मिळतोय आल्हाद
इंद्रधनुष्यी आयुष्यातील सप्तरंगी सुखाचा ठेवा
जन्म देवाची देणगी करतो परमेश्वराचा धावा
ऐलतीरावर आता भगवंता
तुझ्याच सहवासात मी रंगून जातो
दिवसाचा प्रत्येक क्षण भक्तीरसात नाहून निघतो
आणि इथेच जगण्याचा अर्थ उमजतो.

**- डॉ. सोनिया शेट्ये**